The AGM will be convened in compliance with the applicable provisions of the Companies Act, 2013 and the Rules made thereunder ["Act"], provisions of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ["SEBI Listing Regulations"] read with all applicable circulars on the matter issued by Ministry of Corporate Affairs, Government of India and Securities and Exchange Board of India.

The Notice and the Annual Report for the financial year 2025-26 will be available on the Company's website i.e. www.birlaprecision.com, the Company's Registrar and Transfer Agent ["RTA"] viz. KFin Technologies Limited i.e. https://evoting.kfintech.com and on the website of BSE Limited i.e. www.bseindia.com

1. **Dispatch of Annual Report:**

   In compliance with the aforesaid applicable circulars, the Notice of the AGM together with the Annual Report for the financial year 2025-2026 will be sent electronically to the Shareholders whose email addresses are registered with the Company/ its RTA and Depository Participant(s) ["DPs"].

   A letter providing the weblink and path for accessing the Annual Report for the financial year 2025-26 will be sent to those shareholders who have not registered their email address with the Company/RTA/DPs.

2. **Manner of registering/ updating email address, Mobile Number and Bank Account details:**

   i. **Shareholders holding shares in Physical Mode:** By furnishing details in Form ISR-1 duly signed by the Shareholder(s) as per specimen signature registered with the Company together with self-attested copy of PAN card and cancelled cheque leaf at the registered office of the Company or RTA at Selenium Building, Tower-B, Plot No. 31 & 32, Financial District, Nanakramguda, Serilingampally, Hyderabad, Telangana, India – 500 032 or digitally signed documents via email at cs@birlaprecision.com or einward.ris@kfintech.com

   ii. **Shareholders holding shares in Dematerialized Mode:** Register/update with their respective DP.

   iii. Pursuant to SEBI circulars as amended from time to time, with effect from April 1, 2024, shareholders holding shares in physical form and who have not updated their KYC details (PAN, contact details, bank account details and specimen signature) will be eligible (a) to lodge grievance or avail any service request from the RTA, (b) to receive dividend, **only upon completion of KYC details.**

3. **Manner of casting vote through e-voting:**

   Members can attend and participate in the AGM through VC facility only. The instructions for joining the AGM shall be provided in the Notice of the AGM. The Company will provide its members the facility of remote e-voting through electronic voting services arranged by the RTA. Electronic voting shall also be made available to the Members participating in the AGM. In terms of SEBI Circular no. SEBI/HO/CFD/CMD/CIR/P/2020/242 dated December 9, 2020, e-voting process will also be enabled for all 'individual demat account holders', by way of a single login credential, through their demat accounts/websites of National Securities Depository Limited and / Central Depository Services (India) Limited/ DP. Instructions on the process of remote e-voting at the AGM are explained in the Notice of AGM and will also be made available on the Company's website at www.birlaprecision.com .

4. **Dividend and Record Date:**

   The Board of Directors of the Company at their meeting held on May 29, 2026, has recommended final dividend of Rs. 0.05/- per equity share having face value of Rs 2/- each for the financial year ended March 31, 2026.

   The Record date is Thursday, September 03, 2026, fixed for determining entitlement of Members to dividend for the financial year ended March 31, 2026. The dividend, if approved will be paid on or before Thursday, October 08, 2026, to those Members and their mandates whose names appear as:

   1. Beneficial Owners as at the end of business hours on Thursday, September 03, 2026, as per the list to be furnished by National Securities Depository Limited/Central Depository Services (India) Limited in respect of shares held in electronic form, and
   2. Members as per the Register of Members of the Company in physical form which are maintained with RTA at Selenium Building, Tower-B, Plot No. 31 & 32, Financial District, Nanakramguda, Serilingampally, Hyderabad, Telangana, India – 500 032 on Thursday, September 03, 2026.

5. **Important information about tax deduction at source (TDS) on Dividend:**

   Members are also informed that in terms of the provisions of the Income Tax Act, 1961, deduction of tax at source is applicable on dividend payments. The Company is therefore required to deduct Tax at Source at the time of making payment of dividend.

For Birla Precision Technologies Limited

Sweta Gupta
Company Secretary & Compliance Officer

Place: Mumbai
Date: August 16, 2026

५०० चौ. फुटांच्या घरांच्या मागणीसह अन्य मागण्यांसाठी धारावीकर रस्त्यावर

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

धारावी पुनर्विकासाअंतर्गत धारावीकरांना ५०० चौ. फुटांचे घर द्यावे, सर्व धारावीकरांना, पात्र-अपात्र झोपडीधारकांना धारावीत घरे द्यावीत, यासह अन्य मागण्यांसाठी शनिवारी हजारो धारावीकर रस्त्यावर उतरले. त्यांनी 'धारावी बचाव' तिरंगा रॅली काढत आपल्या मागण्या पुन्हा एकदा राज्य सरकारसमोर ठेवल्या.

आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी अशी ओळख असलेल्या धारावीचा पुनर्विकास धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या (डीआरपी) माध्यमातून केला जात आहे. तर या पुनर्विकासाचे कंत्राट अदानी समूहाला मिळाले. दरम्यान, धारावी पुनर्विकासाअंतर्गत झोपडीधारकांना ५०० चौ. फुटांचे घर द्यावे, अशी मागणी धारावीकरांची सुरुवातीपासून आहे. मात्र, ही मागणी काही मान्य होत नसल्याने धारावीकरांमध्ये प्रचंड नाराजी आहे. राज्य सरकारने धारावीकरांना ३५० चौ. फुटांचे घर देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, हे क्षेत्र धारावीकरांना मान्य नाही. ५०० चौ. फुटांच्या घरांच्या मागणीवर धारावीकर ठाम आहेत. तर दुसरीकडे, या पुनर्विकासाअंतर्गत पहिल्यांदा अपात्र रहिवाशांचेही पुनर्वसन केले जाणार आहे. अपात्र रहिवाशांना धारावीबाहेर भाडेतत्त्वावरील गृहयोजनेअंतर्गत घरे दिली जाणार आहेत. मात्र, धारावीबाहेर अपात्र रहिवाशांचे पुनर्वसन करण्यासही धारावीकरांचा विरोध आहे. पात्रता निश्चित प्रक्रियेंतर्गत अधिकाधिक रहिवाशांना अपात्र ठरवून त्यांना धारावीबाहेर फेकण्याचा डाव असल्याचा आरोप धारावी बचाव आंदोलनाचा आहे. त्यामुळे पात्र असो वा अपात्र, सर्व रहिवाशांना धारावीतच घरे देण्याची मागणी धारावी बचाव आंदोलनाची, धारावीकरांची आहे. मात्र, त्यांच्या या मागण्या काही मान्य होताना दिसत नाहीत. धारावीकरांना विश्वासात न घेता, त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत पुनर्विकास पुढे रेटला जात असल्याचा आरोप करत स्वातंत्र्यदिनी हजारो धारावीकर रस्त्यावर उतरले. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' अशा घोषणा देत, तिरंगे झेंडे फडकवत ही रॅली धारावीतील रहिवासी आणि धारावी बचाव आंदोलनाच्या कार्यकर्त्यांनी काढली. संविधान चौक, मुकुंद नगर, सायन-बांद्रा लिंक रोड, धारावी मेन रोड, धारावी कोळीवाडा, धारावी पोस्ट ऑफिस, चामडा बाजार, बडी मशीद, इराणी हॉटेल, क्रॉस रोड, आकाशवाडी गेट या मार्गे या रॅलीचा समारोप शिवनारायण बावडीजवळील एनसीपी-शप कार्यालयावर झाला. यावेळी धारावीकरांनी जोरदार घोषणाबाजी केली. धारावी बचाव तिरंगा यात्रेचे नेतृत्व धारावी बचाव आंदोलनाचे समन्वयक, माजी आमदार बाबुराव माने, अॅड. राजू कोरडे, नसीरूल हक, राष्ट्रवादी शपचे उल्लेश गाजाकोश, आपचे पॉल राफेल, आरपीआयचे अनिल कसारे आदींनी केले. रॅलीत श्यामलाल जैसवार, राहुल गायकवाड, समीर मगरू, अन्सार शेख, आयुब शेख, कलम भाई, शेकाप पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या साम्या कोरडे, माया जाधव, सुरेश सावंत आदींसह हजारो धारावीकर तिरंगे झेंडे घेऊन सहभागी झाले होते.

रेल्वे रूळावरील पहिला केबल स्टेड पूल महालक्ष्मी स्थानकात वर्षाअखेरीस पूलाचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

रेल्वे रुळांवरून जाणारा पहिला केबल स्टेड उड्डाणपूल मुंबई महानगरपालिका बांधणार आहे. हा पूल पश्चिम रेल्वेच्या महालक्ष्मी स्थानकाजवळ केशवराव खाडये मार्गावर बांधण्यात येणार आहे. वांद्रे वरळी सी लिंक पुलाप्रमाणे हा केबल आधारित पूल असेल. या पुलाला आधार देण्यासाठी ७८.५ मीटर उंच पायलॉन (मोठा खांब) उभारावा लागणार आहे. या उड्डाणपुलाचे काम दिनांक ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे पूल विभागाचे उद्दिष्ट आहे.



महालक्ष्मी येथे होणारी वाहतूककोंडी फोडण्यासाठी विकास नियोजन आराखड्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने दोन नवीन पूल बांधण्यात येत आहेत. या पुलांमुळे वाहतुकीचे नियमन सुरळीत होणार आहे. त्यापैकी महालक्ष्मी रेल्वे स्थानकाजवळील केशवराव खाड्ये मार्गावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने केबल आधारित उड्डाणपूल बांधण्यात येत आहे. विकास नियोजन आराखड्यानुसार सुरू असलेल्या या उड्डाणपुलाच्या कामाची अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी नुकतीच पाहणी केली व विविध निर्देश दिले.

केशवराव खाड्ये मार्गावर उभारण्यात येणारा "केबल स्टेड पूल" हा रेल्वे रूळांवरील महानगरपालिकेचा पहिला केबल आधारित पूल आहे. महालक्ष्मी रेल्वे स्थानकानजीक पश्चिम रेल्वेवरून सात रस्ता ते महालक्ष्मी मैदान यांना हा पूल जोडतो. या पुलाची लांबी ८०३ मीटर तर रुंदी १७.२ मीटर आहे. रेल्वे हद्दीतील रुंदी २३.०१ मीटर इतकी आहे.

या उड्डाणपुलाचे काम प्रगतिपथावर असून केबल - स्टेड पुलास आधार देण्यासाठी ७८.५ मीटर उंचीचा पायलॉन (भव्य लोखंडी खांब) उभारण्यात आला आहे. पायलॉनच्या पश्चिमेकडील ९५ मीटर लांबीच्या स्पॅनचे काम पूर्ण झाले आहे. पूर्वेकडील १६५ मीटर लांबीच्या स्पॅनची उभारणी रेल्वे हद्दीतील जागेत रेल्वे विभागाकडून आवश्यक खंड (ब्लॉक) प्राप्त झाल्यानंतर करण्यात येणार आहे.

पायलॉनच्या पश्चिम दिशेकडील बहुतांश खांबांची उभारणी पूर्ण झाली आहे. तथापि, वाहतूक वळविण्याच्या (ट्रॅफिक डायव्हर्जन) कामामुळे पाच खांबांची उभारणी अद्याप प्रलंबित आहे. वाहतूक पोलिसांच्या परवानगीनंतर वाहतूक वळविण्यात येईल. या कामी महानगरपालिकेच्यावतीने कॉंक्रीटचा सेवा रस्ता बांधण्यात येत आहे. विविध उपयोगिता वाहिन्या टाकण्याची कामेही सुरू आहेत. वाहतूक पोलिसांच्या समन्वयाने या सेवा रस्त्यावर वाहतुकीचे अवागमन केले जाईल. एकूणच, काम ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे पूल विभागाचे उद्दिष्ट्य आहे.

नवीन पूलामुळे महालक्ष्मी पूर्वेला केशवराव खाडे मार्ग ते पश्चिमेला (सातरस्ता ते महालक्ष्मी रेसकोर्स) दरम्यान थेट मार्ग उपलब्ध होणार आहे. परिणामी महालक्ष्मी स्थानकावरील सध्याच्या पूलावरील वाहतूक कोंडी कमी होईल व प्रवासाचा वेळ कमी होईल. या नवीन पुलाच्या बांधकामामुळे प्रवासाचा मार्ग अंदाजे २०० मीटरने कमी होईल. त्यामुळे प्रदूषण कमी होईल आणि इंधनाचा खर्चही वाचेल,अशी माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

रॅगिंगप्रकरणी दोषी आढळणाऱ्या विद्यार्थ्याविरोधात गुन्हा दाखल होणार

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) उच्च शिक्षण संस्थांमधील रॅगिंगला आळा घालण्यासाठी कठोर भूमिका घेतली आहे. रॅगिंगबाबत प्राथमिकदृष्ट्या आरोप सिद्ध झाल्यास संबंधित संस्थांनी तातडीने गुन्हा दाखल करून शिस्तभंगाची कारवाई करावी, असे निर्देश यूजीसीने दिले आहेत. रॅगिंगविरोधी नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश उच्च शिक्षण संस्थांना देण्यात आले आहेत.

सर्व उच्च शिक्षण संस्थांनी रॅगिंग रोखण्यासाठी नियमांचे काटेकोर पालन करावे, असे यूजीसीने स्पष्ट केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ८ मे २००९ च्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर यूजीसीने २००९ मध्ये हे नियम अधिसूचित केले आहेत. उच्च शिक्षण संस्थांमध्ये रॅगिंगचे कोणतेही स्वरूप खपवून घेतले जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका या निर्देशांमधून अधोरेखित करण्यात आली आहे.

रॅगिंगविरोधी समित्या आणि संस्थांची प्रभावीपणे स्थापना करून त्यांचे कामकाज सुरू ठेवणे संस्थांसाठी बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या प्रमुख ठिकाणी २४ तास कार्यरत असलेला १८००-

१८०-५५२२ हा टोल फ्री क्रमांक ठळकपणे प्रदर्शित करावा. रॅगिंगविरोधी पोस्टर्स आणि जनजागृती साहित्यही विद्यार्थ्यांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांकडून रॅगिंगविरोधी हमीपत्र घेण्याची प्रक्रियाही अनिवार्य करण्यात आली आहे. ही हमीपत्रे http://www.antiragging.in या संकेतस्थळावरून सादर करावी लागणार आहेत. रॅगिंगचे गांभीर्य विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देण्यासाठी जनजागृती, समुपदेशन, मार्गदर्शन आणि संवेदनशीलता निर्माण करणारे कार्यक्रम नियमितपणे आयोजित करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. वसतिगृहे आणि रॅगिंगची शक्यता असलेल्या इतर ठिकाणी विशेष दक्षता घेण्याचे आदेश संस्थांना देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांकडून आलेल्या तक्रारींकडे दुर्लक्ष न करता त्यांचे तातडीने निराकरण करावे, तक्रारदार विद्यार्थ्यांचे संरक्षण करावे आणि प्रकरणांची वेळेत नोंद व अहवाल सादर करावा, असे यूजीसीने स्पष्ट केले आहे.

रॅगिंगची प्राथमिकदृष्ट्या घटना घडल्याचे आढळून आल्यास प्रकरण दडपण्याचा किंवा तडजोडीचा प्रयत्न न करता तातडीने गुन्हा दाखल करावा आणि संबंधित विद्यार्थ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे रॅगिंगच्या घटनांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना संस्थात्मक पातळीवर संरक्षण मिळण्याची शक्यता कमी झाली आहे.

रॅगिंगविरोधी उपाययोजनांना सर्वाधिक प्राधान्य देऊन 'शून्य सहनशीलता' धोरण राबवावे, असे यूजीसीने बजावले आहे. विद्यापीठांनी त्यांच्या अखत्यारितील संलग्न महाविद्यालयांमध्येही या नियमांची काटेकोर अंमलबजावणी होत की नाही, याची खात्री करावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत. रॅगिंग रोखण्यासाठी केवळ नियम कागदावर न ठेवता त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यावर यूजीसीने भर दिला आहे. त्यामुळे रॅगिंगची तक्रार आल्यास संस्थांनी तत्काळ कारवाई करणे आणि दोषी आढळणाऱ्यांविरोधात कायदेशीर प्रक्रिया सुरू करणे अपेक्षित आहे.

राज्यातील 30 टक्के आयपीएस अधिकाऱ्यांना पोलीस पदके

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून राज्याच्या गृह विभागाने पोलीस दलातील ११८९ जणांना अतिउत्कृष्ट आणि उत्कृष्ट सेवा पदकांची घोषणा केली आहे. राज्यात पहिल्यांदाच अशा रीतीने पदकांची खैरात करण्यात आली आहे. या यादीत ११५ आयपीएस अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

किमान १५ ते कमाल २५ वर्षे सेवा पूर्ण केलेल्या निष्कलंक अधिकाऱ्यांचा विचार करण्यात आलेला असल्याचे सांगितले जात असले तरी केवळ नोंदीवर नसल्यामुळे काही भ्रष्ट अधिकाऱ्यांनाही या खैरातीचा लाभ मिळाला आहे. राज्यातील बहुतांश सर्वच पोलीस आयुक्तालयातील

आयुक्त या पदकांसाठी पात्र ठरले आहेत. यामध्ये मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई, नागपूर, मीरा-भाईंदर येथील आयुक्तांचा समावेश आहे. याशिवाय सर्व पोलीस महासंचालकही पात्र ठरले आहेत. राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या नावाचीही शिफारस होती. मात्र आपण स्वत: आपल्याला पदक कसे घेऊ शकतो, असे स्पष्ट करुन त्यांनी आपले नाव यादीतून वगळले.

राज्यातील आयपीएस अधिकाऱ्यांचे संख्याबळ ३२९ च्या आसपास आहे. त्याचा विचार केला तर ३० टक्के आयपीएस अधिकारी या पदकाचे मानकरी ठरले आहेत. त्यातुलनेत राज्यातील पोलिसांचे संख्याबळ लक्षात घेतले तर त्यांना मिळालेली पदके अत्यल्प असल्याचे दिसून येते. अतिउत्कृष्ट सेवा पदकासाठी महासंचालक, अतिरिक्त महासंचालक, महानिरीक्षक, उपमहानिरीक्षक, अधीक्षक अशा दर्जाचे ५० अधिकारी तर उत्कृष्ट सेवा पदकासाठी १८ महानिरीक्षक आणि ४७ अधीक्षक असे एकूण ११५ आयपीएस अधिकारी पात्र ठरले आहेत. दोन्ही यादीनुसार या पदकांसाठी ७३ उपअधीक्षक/सहायक आयुक्त, २५४ पोलीस निरीक्षक, ६५ सहायक निरीक्षक, ३१७ सहायक उपनिरीक्षक, १५६ उपनिरीक्षक, ८७५ हेड कॉन्स्टेबल, ७९ पोलीस नाईक पात्र ठरले आहेत. या निमित्ताने पोलीस दलातील पदकांपासून वंचित राहिलेल्या अनेकांना या निमित्ताने पदके बहाल झाली आहेत. १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला उत्कृष्ट सेवेबद्दल राष्ट्रपतींचे पदक तर एक मे रोजी पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह अशी पुरस्कारांची संधी होती. आता या निमित्ताने दीर्घकालीन निष्कलंक सेवेबद्दलही यापुढे पदके मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. या यादीत काही भ्रष्ट वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची नावे असली तरी ते नोंदीत निष्कलंक असल्याचे आढळून आले आहेत. या अधिकाऱ्यांच्या वार्षिक गोपनीय अहवालातील शेऱ्याला गुण देऊन या यादीसाठी निवड करण्यात आली आहे, असेही एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

१४ दिवसांत ६८ किमी पदपथ अडथळामुक्त

मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

मुंबईकरांना सुरक्षित, सलग व अडथळामुक्त पदपथ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महापालिकेने हाती घेतलेल्या 'पादचारी प्रथम' अभियानांतर्गत मुंबई शहर व उपनगरांमध्ये पदपथांवरील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे, फेरीवाल्यांचे अडथळे, साठवणूक साहित्य, फलक, बॅनर तसेच पादचारी मार्गात येणारे अन्य अडथळे दूर केले. पहिल्या टप्प्यात २०० पदपथांवरील अतिक्रमण हटविण्यात येणार आहे. त्यापैकी ८… पदपथांचे काम हाती घेण्यात आले… आहे. सुमारे ६८ किलोमीटर अंत… इतके पदपथ अडथळामुक्त करण्यात… आले असून ४४३ कारवाया सुरू… करण्यात आल्या आहेत. यासोबत… या अभियानाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत… १ ते १४ ऑगस्ट या १४ दिवसांच्या… कालावधीत एकूण ३३७ कारवाया… करण्यात आल्या आहेत. यामध्ये… ७७ अनधिकृत बांधकामे आणि ११… अनधिकृत फेरीवाल्यांचे निष्कासन… करण्यात आले आहे. यासोबतच… पदपथांवरील ४९ स्ट्रीट फर्निचर, ६… साठवणूक साहित्य, २७ दुकानांचे… फलक, १४ साईनबोर्ड आणि ४९ बॅनर… हटविण्यात आले. पादचाऱ्यांच्या मार्गात… अडथळा ठरणाऱ्या २५ अधिकृत… दुकानांलगतच्या संरचनांची दुरुस्ती… ८ पदपथांची दुरुस्ती तसेच पदपथांव… निर्माण झालेल्या ८ अनधिकृत… वाहनतळे हटविण्यात आली. उच्च… न्यायालयाच्या निर्देशांनुसार आणि… महानगरपालिका आयुक्त अश्विनी भि… यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम… राबविण्यात येत आहे.

पदपथ हे केवळ पादचाऱ्यां… ये-जा करण्यासाठी नसून शहरातील… सुरक्षित आणि समावेशक वाहतूक… व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहे… या भूमिकेतून महानगरपालिक… प्रशासनाकडून पदपथ सुधारण… आणि अतिक्रमण निर्मूलनाला प्राधान्य… देण्यात येत आहे. या अभियानाच्या… पहिल्या टप्प्यांत पादचाऱ्यांची मोठी… वर्दळ असलेल्या तसेच ज्येष्ठ नागरिक… विद्यार्थी, दिव्यांग व्यक्ती आणि इतर… संवेदनशील घटक मोठ्या प्रमाणाव… वापर करतात अशा ठिकाणच्या पदपथ… सुधारणांना प्राधान्य देण्यात येत आहे… यामध्ये रेल्वे स्थानके, मेट्रो स्थानके… बस थांबे, रुग्णालये, धार्मिकस्थळे… बाजारपेठा, शाळा आणि महाविद्याल…

यांचा समावेश आहे. पादचारी प्रथम' अभियान हे केवळ अतिक्रमण हटविण्यापुरते मर्यादित नसून पदपथांची एकूण गुणवत्ता आणि वापरयोग्यता सुधारण्याच्या दृष्टीने राबविण्यात येत आहे. अनधिकृत किंवा अयोग्य रॅम्प हटविणे, मालमत्तेची प्रवेशद्वारे पदपथावर न उघडता मालमत्तेच्या हद्दीत आत उघडणे, झाडांची योग्य छाटणी करणे, प्रमाणित रचनेनुसार पदपथांची बांधणी करणे आणि पदपथामध्ये असलेले पातळीतील फरक, तुटलेले भाग व अन्य भौतिक…

अडथळे दूर करून पादचारी मार्गाची सलगता कायम ठेवणे यावर भर देण्यात आला आहे. मुंबईतील जवळपास ५० टक्के दैनंदिन प्रवास पायी केला जातो. मात्र, अनेक ठिकाणी असमान किंवा खचलेले पदपथ, चालण्याच्या जागेतील अडथळे, अपूर्ण अथवा सदोष पदपथ रचना, फलक-बॅनर, झाडे, साठवणूक साहित्य, फेरीवाल्यांचा पसारा, अनधिकृत रॅम्प, पार्क केलेली किंवा बेवारस वाहने आदींमुळे पादचाऱ्यांना पदपथाऐवजी रस्त्यावरून चालावे लागते. त्यामुळे…

पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याबरोबरच वाहतूक कोंडी, वाहनांचा वेग कमी होणे आणि त्यातून होणारे वायुप्रदूषण यांसारखे परिणामही होतात.

मुंबई रस्ता सुरक्षेचा वार्षिक अहवाल २०२३ नुसार रस्ते अपघातातील एकूण मृत्यूंपैकी ४४ टक्के मृत्यू पादचाऱ्यांचे होते. प्रत्येक विभागातील किमान ९० टक्के पदपथांची दर महिन्याला पाहणी करून त्यानुसार कारवाई करण्यात येणार आहे. प्रत्येक प्रशासकीय…

विभागाकडून साप्ताहिक अहवाल सादर केला जाणार असून, त्यात पदपथाचे किंवा लगतच्या रस्त्याचे नाव, कारवाईची तारीख, कारवाईचे स्वरूप तसेच कारवाईपूर्वी आणि कारवाईनंतरची छायाचित्रे यांचा समावेश राहणार आहे. परिमंडळातील उप आयुक्तांकडून या अहवालांची पडताळणी करण्यात येणार असून, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्तांकडून अंमलबजावणीच्या प्रगतीचा दर पंधरवड्याला आढावा घेतला जाणार आहे. तसेच …र्ग पोर्टलवरून प्राप्त होणाऱ्या …दपथांवरील अतिक्रमणासंदर्भातील …क्रारींचे विहित कालमर्यादेत …राकरण करून त्याचा नियमित …ढावा घेतला जाणार आहे.

पदपथ मोकळे केल्यानंतर …न्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण …ऊ नये यासाठी सातत्याने पाहणी …रण्यावरही संबंधित प्रशासकीय …भागांकडून भर देण्यात येत आहे. …रम्यान, पादचाऱ्यांना सुरक्षित, …ुलभ आणि अडथळामुक्त पदपथ …पलब्ध करून देत 'पादचारी प्रथम' …ा संकल्पनेला प्राधान्य देण्यासाठी …हानगरपालिकेकडून विविध …पाययोजना करण्यात येत आहेत.

बिर्ला प्रिसिजन टेक्नॉलॉजीज लिमिटेड

BIRLA PRECISION Forward. Together

CIN : L29220MH1986PLC041214

नोंदणीकृत कार्यालय: दलामल हाऊस, पहिला मजला, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१

Tel : +91 022 66168400, E-mail : info@birlaprecision.com, Web : www.birlaprecision.com

३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, बिर्ला प्रिसिजन टेक्नॉलॉजीज लिमिटेड कंपनी च्या सदस्यांची एकोणतिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा एजीएम बुधवार, ९ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता (आयएसटी), एजीएमच्या सूचनेत नमूद केलेले कामकाज पार पाडण्यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व्हीसी द्वारे आयोजित केली जाईल.

ही वार्षिक सर्वसाधारण सभा कंपनी कायदा, २०१३ च्या लागू तरतुदींनुसार आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांनुसार कायदा, तसेच सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या तरतुदींनुसार सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स भारत सरकारचे कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया यांनी या संदर्भात जारी केलेल्या सर्व लागू परिपत्रकांसह आयोजित केली जाईल.

सूचना आणि आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल २०२५-२६ कंपनीच्या वेबसाइटवर म्हणजेच www.birlaprecision.com वर, कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट आरटीए म्हणजेच केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड म्हणजेच https://evoting.kfintech.com आणि बीएसई लिमिटेडच्या वेबसाइटवर म्हणजेच www.bseindia.com वर उपलब्ध असेल.

१. वार्षिक अहवालाचे प्रेषण:

उपरोक्त लागू परिपत्रकांच्या अनुपालनात, वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या वार्षिक अहवालासह त्या भागधारकांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवली जाईल, ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/तिच्या आरटीए आणि डिपॉझिटरी पार्टिसिपंट(स) डीपी यांच्याकडे नोंदणीकृत आहेत.

ज्या भागधारकांनी आपला ईमेल पत्ता कंपनी/आरटीए/डीपी यांच्याकडे नोंदणीकृत केलेला नाही, त्यांना आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल पाहण्यासाठी वेबलिंक आणि मार्ग देणारे एक पत्र पाठवले जाईल.

२. ईमेल पत्ता, मोबाईल क्रमांक आणि बँक खात्याचा तपशील नोंदणी/अद्ययावत करण्याची पद्धत:

१. भौतिक स्वरूपात शेअर्स धारण करणारे भागधारक: भागधारकाने (भागधारकांनी) कंपनीकडे नोंदणीकृत नमुना स्वाक्षरीनुसार रीतसर स्वाक्षरी केलेला फॉर्म आयएसआर-१ मधील तपशील, पॅन कार्डच्या स्व-साक्षांकित प्रतीसह आणि रद्द केलेल्या चेक पानासह कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात किंवा आरटीए (नोंदणीकृत व्यापार प्राधिकरण) येथे सादर करून पत्ता: सेलेनियम बिल्डिंग, टॉवर-बी, प्लॉट नं. ३१ आणि ३२, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली, हैदराबाद, तेलंगणा, भारत - ५०० ०३२ किंवा डिजिटल स्वाक्षरी केलेले दस्तऐवज cs@birlaprecision.com किंवा einward.ris@kfintech.com वर ईमेलद्वारे पाठवावेत.

२. डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात शेअर्स धारण करणारे भागधारक: त्यांच्या संबंधित डीपी (वित्तीय भागीदार) कडे नोंदणी/अद्ययावत करा.

३. वेळोवेळी सुधारित केलेल्या सेबी परिपत्रकांनुसार, १ एप्रिल २०२४ पासून, ज्या भागधारकांकडे प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स आहेत आणि ज्यांनी त्यांचे केवायसी तपशील (पॅन, संपर्क तपशील, बँक खात्याचा तपशील आणि नमुना सही) अद्ययावत केलेले नाहीत, ते (अ) आरटीए कडून तक्रार दाखल करण्यास किंवा कोणत्याही सेवा विनंतीचा लाभ घेण्यास, (ब) लाभांश मिळवण्यास, केवळ केवायसी तपशील पूर्ण केल्यानंतरच पात्र असतील.

३. ई-मतदानाद्वारे मतदान करण्याची पद्धत:

सदस्य केवळ व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुविधेद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित राहू शकतात आणि सहभागी होऊ शकतात. वार्षिक सर्वसाधारण सभेत सामील होण्यासंबंधीच्या सूचना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत दिलेल्या असतील. कंपनी आपल्या सदस्यांना आरटीए द्वारे आयोजित इलेक्ट्रॉनिक मतदान सेवांद्वारे दूरस्थ ई-मतदानाची सुविधा प्रदान करेल. वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होणाऱ्या सदस्यांसाठी इलेक्ट्रॉनिक मतदानाची सुविधा देखील उपलब्ध करून दिली जाईल. सेबी परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/CMD/CIR/P/2020/242 दिनांक ९ डिसेंबर, २०२० नुसार, सर्व 'वैयक्तिक डिमॅट खातेधारकांसाठी' देखील, एकाच लॉगिन क्रेडेन्शियलद्वारे, ई-मतदान प्रक्रिया सक्षम केली जाईल, त्यांच्या नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड आणि / सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड/ डीपीच्या डिमॅट खात्यांद्वारे/वेबसाइट्सद्वारे. वार्षिक सर्वसाधारण सभेतील दूरस्थ ई-मतदानाच्या प्रक्रियेबद्दलच्या सूचना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत स्पष्ट केल्या आहेत आणि त्या कंपनीच्या www.birlaprecision.com या वेबसाइटवर देखील उपलब्ध करून दिल्या जातील.

४. लाभांश आणि नोंदणी दिनांक:

कंपनीच्या संचालक मंडळाने दिनांक २९ मे, २०२६ रोजी झालेल्या त्यांच्या सभेत, अंतिम लाभांश देण्याची शिफारस केली आहे. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी, प्रत्येकी रु. २/- दर्शनी मूल्य असलेल्या प्रति इक्विटी शेअरवर ०.०५/- रुपये लाभांश.

३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी सदस्यांची लाभांशाची पात्रता निश्चित करण्याकरिता रेकॉर्ड तारीख गुरुवार, ०३ सप्टेंबर २०२६ निश्चित करण्यात आली आहे. लाभांश, मंजूर झाल्यास, गुरुवार, ०८ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी, खालील नावे असलेल्या सदस्यांना आणि त्यांच्या प्रतिनिधींना दिला जाईल:

१. गुरुवार, ०३ सप्टेंबर २०२६ रोजी कामकाजाच्या वेळेच्या अखेरीस, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड/सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड द्वारे इलेक्ट्रॉनिक स्वरूपात धारण केलेल्या शेअर्सच्या संदर्भात सादर केल्या जाणाऱ्या यादीनुसार लाभधारक मालक, आणि

२. कंपनीच्या सदस्यांच्या भौतिक स्वरूपातील नोंदवहीनुसार सदस्य, जी आरटीए येथे सेलेनियम बिल्डिंग, टॉवर-बी, प्लॉट नं. ३१ आणि ३२, आर्थिक जिल्हा, नानकरामगुडा, येथे ठेवली आहे. सेरिलिंगमपल्ली, हैदराबाद, तेलंगणा, भारत - ५०० ०३२, गुरुवार, ०३ सप्टेंबर, २०२६ रोजी.

५. लाभांशावरील उद्गम कर कपातीबद्दल (टीडीएस) महत्त्वाची माहिती:

सदस्यांना हे देखील कळविण्यात येते की, आयकर कायदा, १९६१ च्या तरतुदींनुसार, लाभांश वितरणावर उद्गम कर कपात लागू आहे. त्यामुळे, लाभांश वितरित करताना कंपनीला उद्गम कर कपात करणे आवश्यक आहे.

बिरला प्रिसिजन टेक्नॉलॉजीज लिमिटेडसाठी
श्वेता गुप्ता
कंपनी सेक्रेटरी आणि कंप्लायन्स ऑफिसर

ठिकाण: मुंबई
दिनांक: १६ ऑगस्ट, २०२६

नेटलिंक सोल्युशन्स (इंडिया) लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: ५०७, लक्ष्मीप्लाझा, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, न्यूलिंक रोड, अंधेरी (पश्चिम). मुंबई ४०००५३, महाराष्ट्र
Tel.: 022-26355803; Email: netlink@easy2source.com
Web: www.nsil.co.in | CIN: L45200MH1984PLC034789

३० जून, २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठीचे अनऑडिटेड आर्थिक निकालांचे विवरण

(रुपये लाखांमध्ये)

अ. क्र.	तपशील	तिमाही समाप्त	तिमाही समाप्त	तिमाही समाप्त	वर्ष समाप्त
		(अनऑडिटेड)	(ऑडिटेड)	(अनऑडिटेड)	(ऑडिटेड)
		30.06.2026	31.03.2026	30.06.2025	31.03.2026
1	संचालनातून मिळणारे एकूण उत्पन्न (निव्वळ)	67.84	42.30	233.26	345.80
2	कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वीचा निव्वळ नफा	57.84	(2.84)	198.10	190.88
3	अपवादात्मक बाबींनंतरचा करपूर्व निव्वळ नफा	57.84	(2.84)	198.10	190.88
4	करानंतरचा कालावधीतील निव्वळ नफा/(तोटा)	43.06	(2.14)	173.73	(202.93)
5	कालावधीसाठीचे एकूण सर्वसमावेशक उत्पन्न	43.06	(2.14)	173.73	(202.93)
6	समभाग भांडवल	252.92	252.92	252.92	252.92
7	मागील वर्षाच्या ऑडिटेड ताळेबंदात दर्शवल्यानुसार राखीव निृी (पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून)	-	-	-	2985.34
8	मूलभूत आणि डायल्यूटेड प्रति शेअर उत्पन्न (रु. १०/- चे) प्रत्येकी)	1.70	(0.08)	6.87	8.02

टीप:

अ) वरील निकालांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन करून शिफारस केली आणि संचालक मंडळाने त्यांच्या दिनांक १४.०८.२०२६ रोजी झालेल्या संबंधित सभेत त्यास मान्यता दिली.

ब) वरील उतारा हा, सेबी (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियम, २०१५ च्या नियम ३३ अंतर्गत बीएसई लिमिटेड (स्टॉक एक्सचेंज) कडे दाखल केलेल्या, दिनांक ३०.०६.२०२६ रोजी संपलेल्या तिमाहीच्या तिमाही वित्तीय निकालांच्या तपशीलवार नमुन्याचा एक भाग आहे. दिनांक ३०.०६.२०२६ रोजी संपलेल्या तिमाहीच्या वित्तीय निकालांचा संपूर्ण नमुना स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर आणि कंपनीच्या www.nsil.co.in/financials.html. या वेबसाइटवर उपलब्ध आहे. खाली दिलेला क्यूआर कोड स्कॅन करूनही तो पाहता येईल.

नेटलिंक सोल्युशन्स (इंडिया) लिमिटेडसाठी
सही/-
काजल गोपाल बाल्धा
पूर्णवेळ संचालक
डीआयएन-०७४०६५८३

दिनांक: १४.०८.२०२६
स्थळ: मुंबई

ज्युपिटर इन्फोमीडिया लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: ३३६, लक्ष्मी प्लाझा, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, न्यू लिंक रोड, अंधेरी (प), मुंबई - ४०० ०५३.
Email: csc@jupiterinfomedia.com; Web: www.jupiterinfomedia.com; TEL: 91-22-26341691; CIN: L22200MH2005PLC152387

३० जून, २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठीचे अलेखापरीक्षित स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निकालांचे विवरण

(रुपये लाखांमध्ये)

अ. क्र.	तपशील	एकत्रित				स्वतंत्र			
		तिमाही समाप्त	तिमाही समाप्त	तिमाही समाप्त	वर्ष समाप्त	तिमाही समाप्त	तिमाही समाप्त	तिमाही समाप्त	वर्ष समाप्त
		(अलेखापरीक्षित)	(लेखापरीक्षित)	(अलेखापरीक्षित)	(लेखापरीक्षित)	(अलेखापरीक्षित)	(लेखापरीक्षित)	(अलेखापरीक्षित)	(लेखापरीक्षित)
		30.06.2026	31.03.2026	30.06.2025	31.03.2026	30.06.2026	31.03.2026	30.06.2025	31.03.2026
1	संचालनातून एकूण उत्पन्न (निव्वळ)	107.69	35.91	422.04	600.16	15.13	0.16	25.91	13.63
2	कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वीचा निव्वळ नफा	1.72	(91.49)	243.08	59.35	(75.30)	(13.52)	12.93	(38.09)
3	अपवादात्मक बाबींनंतरचा करपूर्व निव्वळ नफा	1.72	(91.49)	243.08	59.35	(75.30)	(13.52)	12.93	(38.09)
4	करानंतरचा कालावधीतील निव्वळ नफा/(तोटा)	1.64	(74.26)	211.36	96.79	(58.10)	(9.72)	10.19	(28.17)
5	कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न	1.64	(74.26)	211.36	96.79	(58.10)	(9.72)	10.19	(28.17)
6	समभाग भांडवल	1,002.00	1,002.00	1,002.00	1,002.00	1,002.00	1,002.00	1,002.00	1,002.00
7	मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्याप्रमाणे राखीव निधी (पुनर्मूल्यांकन राखीव निधी वगळून)	-	-	-	1,609.66	-	-	-	(77.48)
8	मूलभूत आणि विरलित प्रति शेअर उत्पन्न (प्रत्येकी १०% दराने)	(0.18)	(0.73)	1.32	0.05	(0.58)	(0.10)	0.10	(0.28)

टीप

अ) उपरोक्त निकालांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन करून शिफारस केली आणि संचालक मंडळाने त्यांना मान्यता दिली. १४.०८.२०२६ रोजी झालेल्या त्यांच्या संबंधित सभेत संचालकांनी.

ब) वरील उतारा हा, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत बीएसई लिमिटेड (स्टॉक एक्सचेंज) कडे दाखल केलेल्या, ३०.०६.२०२६ रोजी संपलेल्या तिमाहीच्या तिमाही वित्तीय निकालांच्या तपशीलवार नमुन्याचा एक भाग आहे. ३०.०६.२०२६ रोजी संपलेल्या तिमाहीच्या वित्तीय निकालांचा संपूर्ण नमुना स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर आणि कंपनीच्या www.jupiterinfomedia.com या वेबसाइटवर उपलब्ध आहे. खाली दिलेला क्यूआर कोड स्कॅन करूनही तो पाहता येईल.

क) कृपया नोंद घ्यावी की, कंपनीच्या सदस्यांनी २४ जून २०२६ रोजी झालेल्या त्यांच्या सर्वसाधारण सभेत मंजूर केलेल्या विशेष ठरावानुसार, कंपनीचे नाव ज्युपिटर इन्फोमीडिया लिमिटेड वरून बदलून एरिक्सएनर्जिक्स लिमिटेड असे दिनांक १७ जुलै २०२६ पासून बदलण्यात आले आहे. नाव बदलण्याचा अर्ज बीएसई लिमिटेडकडे विचाराधीन आहे.

ज्युपिटर इन्फोमीडिया लिमिटेडसाठी
सही/-
विरेन बकरानिया
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन१०९३१६९१

दिनांक: १४.०८.२०२६
ठिकाण: मुंबई